ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती पाणीपट्टी वसुली व त्यांच्या जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीमधील वाटपाबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१००२ / प्रक्र-६३९ /पापु-०७,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दिनांक : २२ मे, २००३.

पहा :- (१) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि., क्रमांक ग्रापापु-१०९८/ प्र.क्र.२११/पापु-०७, दिनांक १४ डिसेंबर,१९९८

(२) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि., क्रमांक ग्रापापु-१००३/ प्र.क्र.४/पापु-०७, दिनांक ७ फेब्रुवारी, २००३

**प्रस्तावनाः**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत योजना, एका गावची असेल तर संबंधित ग्रामपंचायत व एका पेक्षा अनेक गावांची (प्रादेशिक) असल्यास, संबंधित जिल्हा परिषद व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पार पाडीत आहे.

२. प्रादेशिक योजनांचे व्यवस्थापन , देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सध्याच्या आदेशानुसार जरी संबंधित जिल्हा परिषदेची असली तरी, अशा योजनेसाठी संबंधित ग्राम पंचायत क्षेत्रात पाणीपट्टीद्वारे वसुल झालेल्या रक्कमेपैकी , २० % रक्कम संबंधित ग्रामपंचायत स्वतःकडे ठेवून उर्वरित ८० % रक्कम जिल्हा परिषदेकडे जमा करीत असते. तर, स्वतंत्र गावच्या योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सध्याच्या आदेशानुसार जरी संबंधित ग्रामपंचायतीची असली तरी ग्रामपंचायतीने, पाणीपट्टीद्वारे वसूल केलेल्या रक्कमेपैकी ८० % रक्कम स्वतःकडे ठेवून उर्वरित २० % रक्कम जिल्हा परिषदेकडे जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीत जमा करावयाची आहे.

३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी वरील प्रमाणे व्यवस्था एका विशिष्ट उद्देशाने करण्यात आली होती. स्वतंत्र गावाच्या योजनांसाठी गावाने वसूल केलेल्या पाणीपट्टीपैकी २०% रक्कम जिल्हा परिषदेकडे वर्ग केल्यावर भविष्यात एकादी मोठया स्वरुपाची दुरुस्ती करावयाची झाल्यास, ती या रकमेतून जिल्हा परिषद स्तरावर गठीत केलेल्या जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीतून व्हावी ही अपेक्षा आहे.

तसेच, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या पाणीपट्टी वसूलीपैकी संबंधित प्रादेशिक योजनेतून सुविधा प्राप्त होणाऱ्या गावांनी गावाअंतर्गत देखभालीची व्यवस्था स्वत:कडे ठेवून घेतलेल्या या २०% निधीतून पहावी अशी अपेक्षा आहे. परंतु, प्रत्यक्षात हे नियोजन होत नाही असे दिसून येते. जिल्हा परिषदा उपलब्ध निधीतून अशा मोठया दुरुस्त्या करीत नाहीत. तर, ग्रामपंचायतींना २०% निधी कमी पडतो. बरेचदा याची वसूलीही होत नाही.

४. ग्राम पंचायती अंतर्गत असलेल्या प्रत्येक यशस्वी हातपंपामागे रूपये ५०० व प्रत्येक विद्युतपंपामागे रूपये २५०० अशी रक्कम जिल्हा परिषदेकडे, त्या हातपंपची व विद्युतपंपाची देखभाल व दुरूस्ती जिल्हा परिषदमार्फत व्हावी यासाठी जमा करावयाची आहे. यातून जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या हातपंप देखभाल व दुरूस्तीच्या फिरत्या पथकाव्दारे ग्राम स्तरावरील हातपंपाच्या व विद्युत पंपाच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च भागवावा अशी अपेक्षा आहे.

५. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात आल्या असून, या सुधारित धोरणानुसार हाती घेण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांवरील व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीचा १०० % खर्च संबंधित योजनेच्या लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. तसेच, ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत या सुधारित धोरणापूर्वी पूर्ण झालेल्या योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान टप्प्या टप्प्याने कमी करुन पुढील ५ वर्षात ते पूर्णपणे बंद करावयाचा निर्णय संदर्भिय क्रमांक २ येथील दिनांक ७/२/२००३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

६. वरील वस्तूस्थिती विचारात घेवून, स्वतंत्र व प्रादेशिक योजनांच्या देखभाल व दुरुस्तीच्या सध्याच्या पध्दतीत बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून शासन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या व्यवस्थापन देखभाल व दुरुस्ती संदर्भात मागील सूचना रद्द करुन पुढील प्रमाणे सूचना देत आहे :-

(१) स्वतंत्र गावच्या पाणी पुरवठा योजनेच्या दैनंदिन व्यवस्थापन , देखभाल व दुरुस्ती याची संपूर्ण व भविष्यात योजनेचे आयुष्य संपल्यावर तीची पुनर्बांधणी करण्यासाठीच्या भांडवली गुंतवणुकीपैकी किमान १० % खर्चाची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची असल्याने ती त्या ग्रामपंचायतीने पूर्णत: पार पाडावी. ही जबाबदारी पार पाडीत असताना संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस गावच्या / वाडीच्या पाणी पुरवठा योजनेतील मोठ्या दुरुस्त्या जिल्हा परिषदेकडून अथवा इतर सक्षम संस्थांकडून करून घ्यावयाच्या असतील तर, त्यांना तशी मुभा देण्यात येत असून संबंधीत ग्राम पंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता

समितीने जिल्हा परिषदेशी अथवा इतर सक्षम संस्थांशी तसा रीतसर करार करावा. या करारात पाणी पुरवठा योजनेतील कोणत्या बाबींची दुरूस्ती जिल्हा परिषदेने अथवा इतर संस्थांनी करावी हे त्यामध्ये स्पष्ट पणे नमूद केलेले असावे. या मोठया दुरूस्तीसाठी येणारा खर्च ग्राम पंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने पाणी पट्टीव्दारे वसूल करण्यात आलेल्या रकमेतून जिल्हा परिषदेला कामानुसार अदा करुन भागवावा. अर्थात, ग्रामपंचायतीला हे काम जिल्हा परिषदे ऐवजी इतर संस्थामार्फत (उदा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, लघु पाटबंधारे विभाग इ.) अथवा खाजगी संस्थाकडून विहित पध्दतीने खुले कंत्राट देवून अथवा अंतर्गत पध्दतीने (Departmentally) करुन घेता येईल. ग्रामपंचायतीच्या, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने आवश्यकतेनुसार अशा मोठ्या दुरुस्तीसाठी ग्रामसभेची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. किमान खर्चात पारदर्शक पध्दतीने हे काम करण्यात यावे. त्यासाठी जिल्हा परिषदेकडून अथवा शासनाकडून संबंधित गावास कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळणार नाही. त्यामुळे, **सध्याच्या पध्दतीनुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने योजनेतील पाणी पट्टीच्या रक्कमेपैकी २० % रक्कम जिल्हा परिषदेकडे सरसकट जमा करावयाची आवश्यकता नाही. जिल्हा परिषद व ग्राम पंचायत / इतर संस्था यांच्यातील करारानुसार अशा दुरुस्तीच्या कामांची अंमलबजावणी करावी.**

(२) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या दैनंदिन व्यवस्थापन , देखभाल व दुरुस्ती याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेची असल्याने, ती त्या जिल्हा परिषदेने पार पाडावी. ही जबाबदारी पार पाडीत असताना, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमधील गावातील वितरण व्यवस्थेची देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर अथवा इतर संस्थेवर सोपवावयाची झाल्यास, ती तशी त्यांच्या सहमतीने रीतसर करार करुन सोपविता येईल. त्यासाठी, जिल्हा परिषदेने संबंधीत ग्राम पंचायतीशी अथवा इतर संस्थांशी तसा रीतसर करार करावा. या करारात पाणी पुरवठा योजनेतील कोणत्या बाबींची देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर अथवा इतर संस्थांवर सोपविण्यात येत आहे, हे त्यामध्ये स्पष्ट पणे नमूद केलेले असावे व त्या करारानुसार जिल्हा परिषदेस, ग्रामपंचायतीला वेळोवेळी निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. संबंधित ग्रामपंचायत ही जबाबदारी योग्य पध्दतीने पार पाडीत नसेल तर, जिल्हा परिषद इतर कोणत्याही संस्थेला खाजगी व्यक्तींना, योजनेत अंतर्भूत सर्व ग्रामपंचायतीच्या शिखर समितीस पारदर्शक पध्दतीने / निविदाव्दारे हे काम व्यवस्थापन करार (Management Contract) करुन सोपवू शकेल. संबंधित गावातील पाणीपट्टीची वसूली करण्याची पध्दतही जिल्हा परिषद ठरवेल व वरीलपैकी कोणत्याही यंत्रणेला त्यांच्या वतीने वसूली करून जिल्हा परिषद खात्यात जमा कण्याचीही जबाबदारी सोपवू शकेल. अशा पध्दतीने नियोजन करुन येणारा खर्च पाणी पट्टीव्दारे वसूल करण्यात आलेल्या

रकमेतून जिल्हा परिषदेने भागवावा. त्यासाठी जिल्हा परिषदेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळणार नाही. त्यामुळे, सध्याच्या पध्दतीनुसार प्रदेशिक योजनेतील पाणी पट्टीच्या रक्कमेपैकी २० % रक्कम ग्राम पंचायतीकडे सरसकट जमा करावयाची आवश्यकता नाही. ग्राम पंचायत व जिल्हा परिषद / इतर संस्था यांच्यातील करारानुसार अशा दुरुस्तीच्या कामांची अंमलबजावणी करावी.

(३) ग्राम पंचायती अंतर्गत असलेल्या हातपंपाची व विद्युतपंपाची दुरूस्ती जिल्हा परिषदेकडील देखभाल दुरुस्ती पथकांकडून यासाठीची ठराविक वार्षिक वर्गणी भरुन करून घ्यावी अथवा वार्षिक वर्गणी ऐवजी हे काम सेवेच्या मागणीनुसार म्हणजे Call Basis वर करुन घेऊन प्रत्येक वेळी कराराप्रमाणे रक्कम अदा करावी किंवा कसे या बाबत संबंधित ग्रामपंचायतीने ग्रामसभेत निर्णय घेऊन ठरवावे. त्या निर्णयानुसार संबंधित ग्राम पंचायतीने जिल्हा परिषदेशी तसा करार करून यानंतर जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्यातील व्यवहार त्या करारानुसार व्हावा. यापुढे हातपंप व विद्युतपंप दुरूस्तीसाठी वरील प्रमाणे निधी न भरता अथवा करार न करता जिल्हा परिषदेकडील हातपंप देखभाल व दुरूस्ती पथकाच्या सेवा आपोआप उपलब्ध होणार नाहीत.

(४) ग्रामस्तरावरील सर्व योजनांची १००% देखभाल व दुरुस्ती गावाने करावयाची आहे. त्यात ग्रामस्तरावरील शासनाच्या कोणत्याही निधीतून निर्माण करण्यात आलेल्या साध्या विहिरी व विंधण विहिरींचाही समावेश आहे. या योजनांची मालकी संबंधित ग्रामपंचायतीकडे निहित असून त्यांच्या मालकीच्या त्या योजना आहेत. त्यामुळे, ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवहित त्याची नोंदणी करुन, त्याप्रमाणे महसूल अभिलेख्यातही त्याची नोंद करुन घेण्यात यावी. ही मालमत्ता जिल्हा परिषदेकडे निहीत नाही ही बाब पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात येते असून त्याप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर देखील आवश्यक नोंद घेवून पुढील कार्यवाही व्हावी.

या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

( सुधीर ठाकरे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिष (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
अधिक्षक अभियंता, तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद (सर्व)
उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
... सर्व ... अधिकारी व कार्यासने